**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 08.10.2025** **वार- बुधवार**

---

**जिल्हाधिकारी**

पुणे जिल्ह्यातल्या सर्व बँकांनी वार्षिक पत आराखड्यानुसार पीक कर्ज तसंच केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांच्या कर्ज वितरणाचं उद्दिष्ट वेळेत पूर्ण करावं, असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी दिले आहेत. बँकर्सची जिल्हा सल्लागार समिती आणि जिल्हास्तरीय आढावा समितीच्या बैठकीत ते आज बोलत होते. विविध योजनांचे लाभ देणं, सायबर फसवणुकीबाबत अद्ययावत माहिती देऊन जनजागृती करणं यासाठी बँकांनी आर्थिक साक्षरता मेळावे आयोजित करावेत. स्वयंसहायता समुहाच्या महिलांना त्यात सहभागी करून घ्यावं, असंही जिल्हाधिकारी म्हणाले.

**सौर कृषी योजना**

शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध व्हावी यासाठी राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेतील पुणे, सोलापूर आणि सातारा जिल्ह्यांतील प्रकल्पांमुळे 6 हजार 583 शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीजपुरवठा मिळणार आहे.

**मनपा**

पुणे महापालिकेनं बेकायदा जाहिरात फलक लावणाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे. गुन्हा दाखल झाल्यावर संबधितांना प्रति फलक एक हजार रुपये दंड आकारला जाणार आहे. तसंच हे जाहिरात फलक तयार करणाऱ्या प्रिटिंग प्रेस व्यावसायिकांवर देखील कारवाई केली जाणार आहे. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी याबाबतचे आदेश काढले असून याची अंमलबजावणी देखील तातडीनं सुरु केली जाणार आहे.

**<u>मेट्रो</u>**

पुणे महापालिकेनं नागरिकांच्या सोयीसाठी मेट्रो स्थानकं, स्थानकांची प्रवेशद्वारं आणि वाहनतळासाठी महामेट्रोला 30 वर्षांच्या भाडेकरारानं 20 जागा दिल्या आहेत. मात्र महापालिका प्रशासनाला न विचारता या जागा 'महामेट्रो'ला बिनशर्त, कायमस्वरूपी मालकीनं देण्याबाबतचे आदेश नगरविकास विभागानं काढले आहेत. त्यामुळे पुणे महापालिकेचे अनेक प्रकल्प अडचणीत आले आहेत.

**<u>अतिसार</u>**

पुण्यातील बावधन, भुसारी कॉलनी आणि भूगाव परिसरात गेल्या काही दिवसांत अतिसार, पोटदुखी व उलटी अशा तक्रारींमुळे अचानक खूप नागरिक आजारी पडल्याचं पहायला मिळत आहे. महापालिकेच्या आरोग्य पथकानं केलेल्या पाहणीत पाण्याचे नमुने दूषित असल्याचं आढळून आलं आहे. महापालिकेच्या आरोग्य विभागातर्फे संबंधित भागात तातडीच्या प्रतिबंधक उपाययोजना राबवल्या जात आहेत. पुणे महापालिका  सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. वैशाली जाधव यांनी ही माहिती दिली.

**<u>मानवाधिकार</u>**

पिंपरीतल्या डॉक्टर डी वाय पाटील विद्यापीठात नुकतीच मानवाधिकार विषयावर राष्ट्रीय स्तरावरची पथनाट्य स्पर्धा आणि कार्यशाळा झाली. मानवाधिकारांबाबत जागृती करण्यासाठी महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठानं ही कार्यशाळा आणि स्पर्धा आयोजित केली होती.  मानवाधिकार आयोगाच्या अधिकाऱ्यांसह अनेक तज्ज्ञांनी या कार्यशाळेत मार्गदर्शन केलं.

**<u>मदतनिधी</u>**

अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या राज्यातल्या शेतकऱ्यांच्या मदतीसाठी श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टनं 'मुख्यमंत्री सहायता निधी'ला १ कोटी रुपयांचा धनादेश दिला आहे. सुवर्णयुग सहकारी बँक, महाराष्ट्र बांधकाम व्यावसायिक संघटना, बँक ऑफ इंडिया स्टाफ युनियन आणि कासार सोशल ग्रुपनंही मदतीचा धनादेश दिला आहे.

**मदत**

दरम्यान आज पुणे श्रमिक पत्रकार संघानं पूरस्थितीचं प्रत्यक्ष वार्तांकन करणाऱ्या पत्रकारांच्या मनोगताचा कार्यक्रम आयोजित केला होता. राज्यात पुरामुळे उद्भवलेली विदारक स्थिती सर्वांना माहीत व्हावी, त्याबद्दल जनतेमध्ये संवेदनशील भावना जागृत होऊन सर्वांनी मदतीसाठी पुढे यावं यासाठी या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं.

**व्याख्यान**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात लोकमान्य टिळक स्मृती व्याख्यानमालेत आज संत ज्ञानेश्वर अध्यासनाच्या प्रमुख डॉ. अरुणा ढेरे यांनी गीतारामायणातील काव्यसौंदर्य या विषयावर मार्गदर्शन केलं. विद्यापीठाचं लोकमान्य टिळक अध्यासन, गणित विभाग आणि संत ज्ञानेश्वर अध्यासन यांनी ही व्याख्यानमाला आयोजित केली आहे.

**मराठी भाषा सप्ताह**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अभिजात मराठी भाषा सप्ताहाचा उद्या समारोप होणार आहे. समारोप सोहळ्यात ज्येष्ठ कवी, साहित्यिक रामदास फुटाणे यांना महापालिकेच्या वतीनं मानपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या 'श्यामची आई' चित्रपटाचे दिग्दर्शक सुजय डहाके यांचा देखील यावेळी सत्कार करण्यात येणार आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज संध्याकाळी काही ठिकाणी विजांसह जोरदार पाऊस पडला. उद्या दुपारनंतर आकाश ढगाळ राहून पावसाची शक्यता आहे असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**